

# आदिवासी विद्यार्थ्यांना सौरऊर्जेतून ज्ञानप्रकाश

▶ विनोद पितळे *(मुंबई)*

एकविसाव्या शतकात प्रगतीच्या कितीही गप्पा मारल्या तरी अजूनही कितीतरी गावांमध्ये विजेसारखी सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे दिवसभर नैसर्गिक प्रकाशात आणि संध्याकाळपासून पहाटेपर्यंत घासलेटने पेटवलेल्या दिव्याच्या प्रकाशात दैनंदिन व्यवहार करावे लागतात. विद्यार्थ्यांना दिवाबत्तीच्या प्रकाशात अभ्यास करावा लागतो. शहापूर तालुक्यातील गुंडे या आदिवासी गावातील मुलांना भेडसावणारी वीज समस्या आता दूर

## शहापूरच्या गुंडे गावातील शेकडो आदिवासींना फायदा



होणार आहे, तीही अगदी विनामोबदला व पर्यावरणपूरक मार्गाने. त्यासाठी मुंबईतील 'द ग्रीन इंडिया इनिशिएटिव्ह' (टीजीआयआय) या संस्थेने पुढाकार घेतला आहे.

संस्थेने गुंडे गावातील चैतन्य विद्यालयात खास सौरऊर्जा यंत्रणा उभारली आहे. त्यातून निर्माण होणारी वीज विद्यार्थ्यांना घरी नेण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही वीज सोलर चार्जरच्या माध्यमातून होम

**'आदिवासी मुलांना विशेषतः दहावीच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल, असा हा सौरऊर्जा प्रकल्प आहे. संस्थेने गुंडे सौरशाळा प्रकल्प दत्तक घेतला आहे. यात शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, मुले व त्यांचे पालक यांचा सहभाग महत्त्वाचा आहे. अजूनही ज्या भागात वीज पोहोचली नाही तेथे या सौरऊर्जेवरील होम सोलर लाइटचा वापर केला जाईल. तो पूर्णपणे निःशुल्क असेल. फक्त चार्जिंगसाठी एका वेळेस केवळ १ रुपया आकारला जाईल.'**

**- सचिन शिगवण, संस्थापक टीजीआयआय**

सोलर लाइटमध्ये परावर्तित केली जाईल. दिवसातील ५ तासांच्या चार्जिंगने तब्बल ३ दिवस पुरेल एवढी वीज वापरली जाऊ शकते. त्यामुळे संध्याकाळपासून विजेवरील दिव्याच्या प्रकाशात मुले अभ्यास करू शकतील. सौरऊर्जा आणि हरितऊर्जा यांचा समन्वय साधून हा प्रकल्प राबवण्यात आला आहे. शाळेतील विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक, मुख्याध्यापक यांच्या सहभागातून टीजीआयआयने प्रकल्पाची आखणी केली आहे. सौर यंत्रणा व सौर कुकर बसवण्याचे काम पूर्ण होत आले आहे. या कुकरमध्ये एकाच वेळी ४०० मुलांसाठी दुपारची ३० किलो खिचडी शिजवली जाईल. त्यासाठी फक्त ३ तास वेळ लागेल. या यंत्रणेतून वीज निर्माण होताना शून्य टक्के कार्बन निर्माण होईल. त्यामुळे हरित व सौर ऊर्जा यांचाही एक प्रकारे समन्वय साधला जाईल. सोलर कुकर जूनपासून सुरू होत आहे. या प्रकल्पासाठी डोंबिवली रोटरॅक्ट क्लबने सहाय्य केले आहे.

vinod.pitale@prahaar.co.in

---

**'मिठाच्या नावाखाली भूखंडांवर डोळा' या २१ मे रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या बातमीत एकविरा प्रतिष्ठानचे संचालक नंदकुमार पवार यांचे नाव अनवधानाने मधू पवार असे प्रसिद्ध झाले होते. त्याबद्दल दिलगीर आहोत.**